C-64


# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

( महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ )

32 वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - 400 005.

दूरध्वनी : (022)2215 1847 फॅक्स :(022) 22151867 ई मेल: info.mahasecurity@maharashtra.gov.in


जा.क्र.: मरासुम / मा. सं. / अंतर्गत बदली धोरण /138/ २०२२ दि. 25-०१-२०२२

## -: कार्यालयीन आदेश :-

### विषय :- सुरक्षा कर्मींच्या अंतर्गत बदलीबाबतचे धोरण.

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामार्फत विविध आस्थापनेवर सुरक्षा कर्मीची सेवा पुरविण्यात आलेली आहे.

महामंडळाच्या आस्थापनेवरील कार्यरत सुरक्षा कर्मींच्या त्यांच्या वैयक्तीक / आर्थिक / कौटुंबिक ईत्यादी विविध कारणास्तव सोयीस्कर असलेल्या ठिकाणी अंतर्गत बदलीबाबत कार्यालयात अर्ज सादर करतात. दिनांक ०६-०२-२०२० रोजीच्या मा. व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेनुसार अंतर्गत बदली करण्यात येत होती. त्यामध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. अंतर्गत बदलीसाठी सुरक्षा कर्मीची अर्ज हे प्रत्येक महिन्याच्या **२५** तारखेपर्यत कार्यालयात सादर करावेत.
२. महामंडळात नव्याने नियुक्त झालेल्या सुरक्षा कर्मीचा **०१** कंत्राट कालावधी पूर्ण झाल्यानंतरच अंतर्गत बदली साठी पात्र ठरविण्यात येईल.
३. ज्या सुरक्षा कर्मीची कसुरी कारणास्तव बदली झालेली असेल अशा सुरक्षा कर्मीचे बदली दिनांकापासून पुढिल **०१** कंत्राट कालावधी अंतर्गत बदली करिता अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.
४. तसेच जुहू विमानतळ येथील कार्यरत सुरक्षा कर्मींना **BCAS** चे प्रशिक्षण देण्यात येत असल्याकारणाने सदर आस्थापनेवरील किमान **०२** कंत्राट कालावधी पूर्ण झाल्यानंतरच सदर सुरक्षा कर्मींना अंतर्गत बदलीसाठी ग्राहय धरण्यात येईल. इतर विमानतळ आस्थापनांनी अशा प्रकारे विनंती केल्यास त्यांची विनंती ग्राह्य धरण्यात येईल. परंतु अपवादात्मक परिस्थितीत देखील जूहू विमानतळ येथील सुरक्षा कर्मींना इतर विमानतळ आस्थापनपाकरिताच अंतर्गत बदलीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

५. ज्या सुरक्षा कर्मीची त्यांच्या विनंती नुसार अंतर्गत बदली एक वेळा झाल्यास त्या सुरक्षा कर्मींचा पुढिल **०३** वर्षाकरिता अंतर्गत बदलीसाठी विचार केला जाणार नाही. (अपात्र ठरविण्यात येईल) तथापि, मरासुमच्या आदेशान्वये प्रशासकीय कारणास्तव कधीही बदली करण्यात येईल.

६. ज्या सुरक्षा कर्मीची हत्याऱ्याचे फायरिंग प्रशिक्षण झालेले नाही, अशा सुरक्षा कर्मींना हत्यारी सुरक्षा कर्मी सोबत अंतर्गत बदलीसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**(संजय पाण्डेय)**
**पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१. DGP / MD, मरासुम, मुंबई.
२. ADGP / Jt.MD, मरासुम, मुंबई.
३. DIGP / Dy. MD, मरासुम, मुंबई.
४. DIGP / Director (Operation), मरासुम, मुंबई.
५. पोलीस अधिक्षक / महाव्यवस्थापक (अभियान), मरासुम, मुंबई.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी सादर (ईमेलव्दारे)**

१. संचालक (प्रशासन), मरासुम, मुंबई.
२. संचालक (वित्त), मरासुम, मुंबई.
३. संचालक (प्रतिष्ठापना), मरासुम, मुंबई.
४. सर्व आस्थापना प्रभारी अधिकारी, मरासुम, मुंबई.
५. प्रभारी सुरक्षा अधिकारी, नियंत्रण कक्ष, मुंबई.